# नियमित दिवाणी दावा क्र.१४२/१३ मधील नि.५० वरील आदेश

वादीने प्रस्तुत अर्ज दावा मिळकत गटनंबर ३२६/१/अ क्षेत्र १ हेक्टर, १९ आर या मिळकतीतील उस पिक प्रतिवादी नं. १,२ यांच्या नांवे दि.११.०४.२०१४ ते १४.०४.२०१४ या कालावधीत उस कापणी होवून सोनहिरा सहकारी साखर कारखाना लि.वांगी, ता.कडेगांव या कारखान्यास गाळपासाठी गेलेला आहे. त्याचे उस बिल अदयाप त्यांना अदा केले नाही. उसबिलामध्ये वादीचा देखील हिस्सा आहे. वादीचा हिस्सा वादीला मिळू नये म्हणून दोन्हीही प्रतिवादी रकमेची उचल करण्याच्या प्रयत्नात आहेत. याच प्रतिवादींनी गटनंबर ३४६/२, क्षेत्र १ हेक्टर, ६० आर यामधील उस पिकाचे बिल साखर कारखान्यातून उचललेले आहे. त्यावेळी रक्कम वादीला दिलेली नाही. साखर कारखान्यातील बिल जोपर्यंत तेथेच राहील तोपर्यंत वादीला मिळण्याची खात्री आहे. तेव्हा वादीचा अर्ज मंजूर करुन कार्यकारी संचालक, सोनहिरा सहकारी साखर कारखाना लि.वांगी यांना तसा आदेश करुन रक्कम कोर्टात जमा करण्याबाबतचे आदेश करावेत अशी विनंती वादीने केली आहे.

२. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी नं. १ व २ यांनी आपले म्हणणे दाखल केले आहे. त्यांचे म्हणणे थोडक्यात असे आहे की, वादीस अशा प्रकारचा अर्ज देण्याचा कोणताही अधिकार नाही **(No locus standi).** साखर कारखाना दाव्याच्या कामी पक्षकार नाही. वादीचा हिस्सा किती आहे ते अदयाप ठरले नाही. उस बिलाची रक्कम हा दाव्याचा विषय नाही, या रकमेवर वादींनी कोर्ट फी दिलेली नाही. वादी हा मागील २० ते २५ वर्षापासून नाशिक येथे कायमपणे वास्तव्य करुन आहे. वादीचा कोणताही कब्जा १२ वर्षापेक्षा जास्त कालावधी पासून नाही. अर्ज कायदयाने चालण्यास अपात्र आहे. भविष्यात होणा-या हुकुमनाम्याची अंमलबजावणी करण्यास प्रतिवादी तयार

आहेत. प्रतिवादी नं.२ यांचा या दाव्याशी कोणताही संबंध नाही. वादीस नोकरीच्या ठिकाणी रुपये ५० हजार पर्यंत मासिक पगार आहे. वादीने प्रतिवादींकडून वेळोवेळी रक्कम घेवून नाशिक येथे घर मिळकती तयार करुन ठेवल्या. त्यास भाडे उत्पन्नाचे असे मार्ग आहेत. प्रतिवादी हे वयस्कर आहेत. प्रतिवादींनी शेतजमीन बागायत करण्यासाठी कर्ज काढले आहे. या मिळकतीत वादीची कोणतीही वहिवाट नाही. प्रतिवादींना शेतीशिवाय दुसरे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. प्रतिवादींना कर्जाचा बोजा आहे. या सर्व बाबींचा विचार करुन वादींचा अर्ज नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

३. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

४. वादीच्या अर्जातील कथन व प्रतिवादींच्या म्हणण्यामधील कथन यावरुन प्रस्तुत अर्जाच्या निकालार्थ खालील मुददे काढण्यात आले आहेत व त्या मुददयांचा निष्कर्ष खालील कारणांवरुन मुदयांसमोरील निष्कर्षाप्रमाणे निर्णय देण्यात आला आहे.

| अ.क | मुद्‌दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | प्रस्तुत अर्ज कायदयातील तरतुदीनुसार सद्य परिस्थितीत दाखल करता येतो असे वादी अर्जदाराने सिध्द केले आहे काय? | नकारार्थी |
| २ | वादी हा अर्जातील मागणीप्रमाणे सद्यस्थितीत साखर कारखान्यातील बिले मे.कोर्टात जमा करण्याच्या मागणीस पात्र आहे काय? | नकारार्थी |
| ३ | आदेश कोणते? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>मुददा कमांक १ ते ३ करीता</u>

५. वादीने प्रस्तुत दावा, दावा मिळकत शेतजमीन व घर मिळकती यांची वाटणी

होवून आपला हिस्सा पृथक होवून त्याप्रमाणे कब्जा मिळण्यासाठी दाखल केला आहे. दावा मिळकती शेतजमीनी एकूण ९ मिळकती आहेत. त्यापैकी प्रस्तुत अर्जात गटनंबर ३२६/१/अ बाबत आपला अर्ज दाखल केला. शिवाय गटनंबर ३४६/२ मधील उस बिले प्रतिवादींनी उचलली आहेत असेच नमूद केले. याचा अर्थ प्रतिवादींनी एक गटातील उस बिलाची रक्कम उचलली आहे आणि आता त्यातील रक्कम प्रतिवादीकडून मागता येत नाही. म्हणून गट नं. ३२६/१/अ च्या बाबत अर्ज दाखल केला. यातील उस बिले अदयाप साखर कारखान्यात प्रलंबित आहेत असे वादीचे म्हणणे आहे. प्रस्तुत दावा अदयाप प्रतिवादी नं. १५ सौ. पद्मिनी हणमंत करांडे यांना दाव्याचे समन्सची बजावणी होण्याकरीता प्रलंबित आहे. अर्थात ही पक्षकार बेपत्ता आहेत असे वादीने दाव्यात नमूद केला आहे. बजावणीच्या बाबतीत वादीने स्टेप्स घेत आहेत परंतु बजावणीची कार्यवाही अदयाप पूर्ण करावयाची आहे. दावा मिळकतीमध्ये शेतजमीनी ९ मिळकती आहेत आणि घर मिळकत एक जुने कौलारु घर अशी एक मिळकत आहे. शिवाय ग्रामपंचायत मिळकत नं.७०० पडीक अवस्थेत असलेली घरजागा या प्रमाणे या दाव्यात दावा मिळकती आहेत.

६. वादी याचा दावा, दावा मिळकतीमध्ये १/४ हिस्सा असल्याचे कथन करुन १/४ हिश्श्याची मागणी केलेली आहे. दाव्याचे कामकाज अदयाप प्राथमिक अवस्थेत आहे. प्रस्तुत दाव्यात निशाणी ५ तुर्तातुर्त मनाईचा अर्ज वादीने दाखल केलेला नाही. वादीस दावा मिळकतीमध्ये १/४ हिस्सा असल्याचे वादीला आपल्या तोंडी व कागदोपत्री पुराव्यानुसार प्रस्तुत दाव्याच्या कामी मागणीप्रमाणे सिध्द करावयाचे असते. प्रतिवादींनी आपल्या म्हणण्यानुसार वादीस मिळणारा हिस्सा न्यायालयाच्या हुकुमनाम्यानुसार देण्याची तयारी दर्शविली आहे. कायदयातील तरतुदींनुसार दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश २०, नियम १२ नुसार वादीला दावा मिळकतीच्या बाबतीत दरम्यानच्या उत्पन्नाची मागणी करता येते अशी कायदयात तरतूद केलेली आहे. अशी मागणी करण्याचा हक्क

व अधिकार वादीला आहे. दरम्यानच्या उत्पन्नाबाबतचा मुददा देखील दाव्यातील संपूर्ण पुरावा झाल्याखेरीज व तसेच तशी मागणी असल्याखेरीज विचारात घेता येत नाही.

७. प्रतिवादींनी दावा मिळकत शेतजमीनी व घर मिळकती वादीला त्याचा कोणताही हक्क मिळू नये म्हणून या मिळकतीची विक्री,विल्हेवाट, हस्तांतर करण्याच्या प्रयत्नात आहेत असा वादीचा दावा नाही. ज्याअर्थी अशी तक्रार वादीची नाही, त्याअर्थी दावा मिळकतीतील वादीचा हक्क, वादीला मिळू नये म्हणून प्रतिवादींनी कार्यवाही करीत आहेत असे वादीने प्रथमदर्शनी दाखवून दिले नाही. याचाच अर्थ प्रतिवादी दावा मिळकतीची कोणत्याही प्रकारे विल्हेवाट करीत नाहीत असे स्पष्ट दिसून येते. त्यामुळे वादीला प्रस्तुत अर्ज कायदयानुसार दाखल करता येत नाही.

८. वादीने प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहितेमधील कोणत्या कलमानुसार, आदेशानुसार दाखल केला आहे याबाबत अर्जात कोणताही उल्लेख नाही. त्यामुळे प्रथमदर्शनी प्रस्तुत अर्ज हा नियमबाहय आहे. अशा प्रकारे वादीच्या अर्जातील मागणी मंजूर करता येत नाही. यावरुन वरील दोन्हीही मुददे नकारार्थी देण्यात आले आहेत आणि मुददा क्रमांक ३ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## आ दे श

**१.** वादीचा प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्यात येतो.

sdxx
**(वि.र.दासरी)**
**दिवाणी न्यायाधीश क स्तर कडेगांव**

कडेगांव
दि.११.०७.२०१४